दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २०४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१९ ऑक्टोबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# सहा वाहनांच्या भीषण अपघातात ३ ठार ६ जखमी



**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई पुणे एक्स्प्रेस वेवर सोमवारच्या पहाटे साडे पाच वाजण्याच्या सुमारास सहा वाहनांचा विचित्र व भिषण अपघात झाला. यामध्ये तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर सहा जण जखमी झाले आहेत.

मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर कोंबडी वाहून नेणाऱ्या टेम्पोने पुढच्या टेम्पोला धडक दिली. याचवेळी पाठीमागून आलेली कार टेम्पोवर धडकली. तर मागून आलेला ट्रेलर कार वर धडकला. ट्रेलर कारवर आदळल्याने कारचा अक्षरशः चुराडा झाला. एक, दोन नव्हे, एकामागोमाग सहा वाहने एकमेकांवर आदळून भीषण अपघात झाला.

यामध्ये अपघातग्रस्त कारमधील दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर कोंबड्यांनी भरलेला टेम्पोच्या चालकाचाही या अपघातात मृत्यू झाला आहे. तर अन्य ६ प्रवासी जखमी झाले असून, त्यांना खोपोली येथील रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. या अपघातात इसार अहमद खान (३९), रोनक मोरदानी (२८), इर्शाद सिद्दीकी (३०) हे मृत झाले असून, राजेश सरोज (४७), तिजोद्दीन मालिखान, रफिक शेठ, अनुप (पूर्ण नाव माहित नाही) व अन्य २ असे मिळून ६ जण जखमी झाले आहेत. या अपघातामुळे एक्स्प्रेस वेवर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. एक्स्प्रेस वेवर कि.मी.३९ येथे रस्त्याचे काम सुरु असल्यामुळे चालकाला अंदाज न आल्यामुळे हा अपघात झाल्याचे बोलले जात आहे. या अपघाताची माहिती मिळताच वाहतूक पोलीस, आय आर्मी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स, महामार्गावर काम करणारे कर्मचारी, अपघातग्रस्त टीम यांनी घटनास्थळी हजर राहून अपघातग्रस्तांची मदत केली.

## संक्षिप्त...

### राज्यात मुलांच्या लसीकरणाच्या तयारीला लागा : उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोना रुग्णांच्या संख्येत घट होत असल्याने राज्यातील उपाहारगृहे, दुकानांच्या वेळा वाढविण्यासंदर्भात आज टास्क फोर्सच्या बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. तसेच अम्युझमेंट पार्कमधील मोकळ्या जागेत कोरड्या राईड्ससाठी परवानगी देण्याचे ठरले. पार्क्स मधील पाण्यातल्या राईड्सबाबतीत नंतर निर्णय घेण्याचे ठरले. वर्षा येथे झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. या वेळी लहान मुलांच्या टास्क फोर्सचे सदस्य देखील उपस्थित होते. अम्युझमेंट पार्क देखील २२ ऑक्टोबर पासून सुरू होतील. कोविडव्यतिरिक्त डेंग्यू, चिकनगुनिया यांच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ असून त्यांच्या उपचारांकडे देखील पुरेसे लक्ष द्यावे, अशी सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केली. आपण हळूहळू निर्बंध शिथिल करीत असून रुग्ण संख्या कमी होतांना दिसते. २२ ऑक्टोबरपासून आपण चित्रपटगृहे, नाट्यगृहे सुरू करीत आहोत. उपाहारगृहे व दुकाने यांची देखील वेळा वाढवून देण्याची सातत्याने मागणी होत आहे. त्यामुळे त्यांच्या वेळा वाढविण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले. मुलांच्या लसीकरणासंदर्भात केंद्राच्या संपर्कात राहून लस उपलब्ध करून घेणे तसेच याबाबतीत निर्णय झाल्यावर लसीकरणाची तयारी ठेवण्याचे नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागास केल्या.

## पनवेलमधील महिला वकील मृत्यूप्रकरणी...

# डॉ.प्रमोद गांधीसह सहा जणांविरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल शहरातील ॲड.अश्विनी थवई यांच्या मृत्यूप्रकरणी पनवेलमधील गांधी हॉस्पिटल, पटेल हॉस्पिटल यांच्यासह कोरोना पॉझिटीव्ह असल्याचा खोटा अहवाल बनविणाऱ्या वाशी येथील प्रयोग शाळेतील डॉक्टर अशा एकूण सहा जणांवर हलगर्जीपणा तसेच कोरोना रिपोर्टमध्ये बनावटगिरी केल्याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार पनवेल शहर पोलीस ठाण्यामध्ये या डॉक्टरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पनवेलमधील महिला वकील अश्विनी थवई या मे महिन्यामध्ये पोटातील शस्त्रक्रियेसाठी पटेल हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्या होत्या. त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली जात असताना त्या अचानक अत्यवस्थ झाल्याने त्यांना गांधी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्या ठिकाणी त्यांना एक दिवस अतिदक्षता विभागात ठेवून दुसऱ्या दिवशी मृत घोषित करण्यात आले. पटेल हॉस्पिटलमध्ये ॲड.अश्विनी थवई यांच्यावर शस्त्रक्रिया करताना डॉ.धर्मेश मेहता यांनी अश्विनी यांना भुल दिली होती. तर डॉ. कृतिका रमेश पटेल या अश्विनी यांच्यावर शस्त्रक्रिया करत होत्या. जास्त प्रमाणात भुल दिल्यामुळे तसेच शस्त्रक्रियेदरम्यान जास्त रक्तस्त्राव झाल्यामुळे अश्विनी यांचा मृत्यू पटेल हॉस्पिटलमध्येच झाल्याचा आरोप त्यावेळी मृत अश्विनी थवई यांच्या कुटुंबियांनी केला होता.

तसेच मृत असलेल्या अश्विनी थवई यांना गांधी हॉस्पिटलने सुद्धा एक दिवस अतिदक्षता विभागात ठेवल्याचा आरोप पती निशांत थवई यांनी करत याबाबतची तक्रार पनवेल पोलीस ठाण्यात केली होती. मात्र पोलिसांनी या प्रकरणात काहीच कारवाई न केल्यामुळे त्यांनी पनवेल न्यायालयात धाव घेतली.

तसेच दोन्ही हॉस्पिटलकडून प्रकरण दडपण्यासाठी करण्यात आलेली बनावटगिरी न्यायालयासमोर सादर केली होती. त्यानंतर न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेवून सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पोलिसांनी पटेल हॉस्पिटलचे डॉ.रमेश पटेल, त्यांची पत्नी डॉ.कृतिका पटेल, भुलतज्ज्ञ डॉ.धर्मेश मेहता, त्याचप्रमाणे गांधी हॉस्पिटलमधील डॉ.प्रमोद गांधी, वाशीतील युडीसी लॅबमधील डॉ.मानसी ठाकूर, डॉ.जयंत सरगर या सहा डॉक्टरांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

गांधी हॉस्पिटलने हा प्रकार लपविण्यासाठी तसेच अश्विनी यांचा मृत्यू कोरानामुळे झाल्याचे भासविण्यासाठी वाशीतील युडीसी सॅटेलाईट लॅबोरेटरीजमधून त्यांचा खोटा कोरोना पॉझिटीव्ह रिपोर्ट बनवून घेतल्याचे उघडकीस आले आहे. हा सर्व प्रकार ॲड.अश्विनी थवई यांचे पती निशांत थवई यांनी न्यायालयासमोर सादर केल्यानंतर न्यायालयाने या गंभीर प्रकारणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

## मुंबई-गोवा महामार्गावर अपघात एक ठार, दोन जखमी



**दै.रायगड नगरी । पेण**


मुबंई- गोवा महामार्गावर पेण तालुक्यातील वडखळ पोलिस ठाण्याचे हद्दीत खारपाले गावाजवल कार ट्रेलरवर आदलल्याने झालेल्या अप-घातात एक ठार व दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

मुंबई - गोवा महामार्गावर नागोठणे बाजुकडुन वडखळकडे जाणारा ट्रेलर क्रमांक एम.एच. ०६ बी.डब्लु ०३६० तर, कार नंबर एम. एच.१४ ई. वाय. ९६८७ नागोठणे बाजुकडुन वडखळकडे जाणारी कार ट्रेलवर खारपाले गावाजवळ आदलल्याने झालेल्या अपघातात कारमधील अभिषेक अमृत म्हात्रे वय २३ राहाणार डोलवी तालुका पेण हा जागीच ठार झाला तर देवेंद्र दत्तात्रेय गोखले वय २७ राहाणार उत्कर्ष नगर पेण, महम्मद फिरोज आलम राहाणार वडखळ हा गंभीर जखमी झाला असुन त्याला उपचारासाठी जे.जे. रुग्णालय मुंबई येथे दाखल करण्यात आले होते. या अपघाताची नोंद वडखळ पोलिस ठाण्यात करण्यात आली असुन अधिक तपास वडखळ पोलिस करीत आहेत.

## साडे बारा टक्के योजनेतील जमिनींचे वाटप येत्या दीड वर्षांत पूर्ण करण्याचा सिडकोचा मानस

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाने साडे बारा टक्के योजने अंतर्गत नवी मुंबईतील प्रकल्पबाधितांना किंवा त्यांच्या वारसांना करण्यात येणारे जमिनीचे वाटप येत्या दीड वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी म्हणून सिडकोचे मुख्यालय असलेल्या, सिडको भवन येथील सातव्या मजल्यावरील साडे बारा टक्के योजना कार्यालयाचे स्थलांतर तळ मजल्यावर करण्यात आले आहे. या विभागाचे उद्घाटन आज दिनांक १८ ऑक्टोबर २०२१ रोजी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, एस. एस. पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक, कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, अजिंक्य पडवळ, मुख्य भूमी व भूमापन अधिकारी व अन्य अधिकारी आणि कर्मचारी देखील उपस्थित होते.



नवी मुंबई विकसित करण्याकरिता शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ अर्थात सिडकोची १९७० मध्ये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाकडून नियुक्ती करण्यात आली होती. नवीन शहर विकसित करण्याकरिता सिडकोकडून स्थानिकांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या. या प्रकल्पबाधितांना त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा योग्य मोबदला मिळावा याकरिता साडे बारा टक्के ही अभिनव योजना अस्तित्वात आली. .../२

> नवी मुंबई प्रकल्पबाधितांना संपादित जमिनींकरिता योग्य मोबदला देण्यासह त्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता साडे बारा टक्के योजना ही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. येत्या दीड वर्षात या योजने अंतर्गत बाकी असलेले जमिनीचे वाटप पूर्ण करण्याचे उद्दिष्ट सिडकोने आखले आहे. याकरिता सदर योजनेतील प्रकरणे अधिक वेगाने मार्गी लावण्यात येणार आहेत.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## आघाडी करायची की नाही हा निर्णय शरद पवार उद्धव ठाकरे, काँग्रेसचे वरिष्ठ नेते घेतील : खा.सुनील तटकरे



**दै.रायगड नगरी । गोव-कोलाड**

रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने पहिला युवक मेळावा रोहा शहराच्या कुंडलीकेच्या तिरावरील संवर्धन ग्राउंड मध्ये आयोजित करण्यात आला होता. अभूतपूर्व प्रतिसाद लाभलेल्या सदर मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून खासदार सुनील तटकरे, पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार निलेश लंके व मावळ मतदार संघाचे आमदार सुनील शेळके हे उपस्थित होते.

यावेळी कोकणचे भाग्यविधाते कार्यसम्राट रायगडचे लोकप्रिय खासदार तटकरे यांनी युवकांना मार्गदर्शन करतांना सांगितले की आजकल ज्यांच्या मनात जे येतो ते बोलत आहे हल्ली रायगड जिल्ह्यात काही झाले तरी सुनील तटकरे यांनी केले अशी ओरड कायम केली जात आहे. आघाडी करायची की नाही या बाबत आमच्या पक्षाचे वरिष्ठ नेते शरद पवार, शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे, तसेच काँग्रेसचे वरिष्ठ नेते जे ठरवतील त्या पद्धतीत निवडणूकीला समोरे जाण्याची आमची तयारी असल्याचे सांगत खासदार पुढे म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये आमदार निलेश लंके सारखे सामाजिक जाणीव असलेले कार्यकर्ते तथा आमदार आहेत. ज्यांनी कोरोना काळ स्वतः च्या जीवाची पर्वा न करता स्वखर्चाने शरद पवार सेवा मंदिर तयार करून ३५ हजार कोरोना रुग्णांवर मोफत उपचार करून बरे करुन सुख रुप घरी पाठवले असल्याचे यावेळी सांगितले.

तसेच आमदार निलेश लंके यांनी रायगडच्या युवकांना मार्गदर्शन करतांना सांगितले की राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्ष नाही हा एक कुटुंब आहे इथे सर्वांना समान न्याय व सन्मान हक्क दिला जातो. आज या युवक मेळाव्यात उपस्थित राहून येथील युवकांना भेटल्यानंतर तसेच अभूतपूर्व अलोट जनसमुदाय पहिल्या नंतर आमचे युवा आमदार अनिकेतभाई आमच्या चार पाऊले पुढे असल्याचा आनंद व्यक्त करत पुढे म्हणाले की आम्हाला वाटत होते की युवकांची फौज माझ्या कडे व आमदार सुनील शेळके जवळच आहे परंतु आमच्या पेक्षा अधिक फौज या ठिकाणी पाहण्याचा आनंद मिळाला आहे. त्याच बरोबर आदिती ताई तुम्हाला मतांची काय फिकर तुमच्या जवळच एवढी मोठी युवकांची फौज उभी आहे त्यामुळे तुम्हाला कसलीही चिंता नाही.

आमदार सुनील शेळके यांनी युवा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की .../२

## शनिवारी पनवेलमध्ये 'दिलखुलास गप्पा'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप उत्तर रायगड सांस्कृतिक सेलच्या वतीने संवाद माला पुष्प ३ अंतर्गत प्रसिद्ध अभिनेते तथा लेखक शरद पोंक्षे यांच्याशी दिलखुलास गप्पा कार्यक्रमाचे पनवेलमध्ये आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ०६ वाजता पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहात हा कार्यक्रम होणार असून एबीपी वृत्तवाहिनेचे वृत्तनिवेदक दिपक पळसुळे हा त्यांची मुलाखत घेणार आहेत. यावेळी 'मी आणि नथुराम' या पुस्तकाच्या ८ व्या आवृत्तीचे लोकार्पण करण्यात येणार आहे. कोरोना नियमांचे पालन करून होणार्या या कार्यक्रमासाठी प्रवेश निशुल्क असून प्रवेशिका अनिवार्य व मर्यादित आहेत. अधिक माहितीसाठी भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन (९०२९५८०३४३) किंवा गणेश जगताप (९८७०११६९६४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिवडी-न्हावा सागरी सेतूला बॅ. अंतुले यांचे नाव द्यावे : महेंद्र घरत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोकणचे भाग्यविधाते म्हणून समजले जाणारे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीयमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांचे नाव नव्याने उभे रहात असलेल्या न्हावा शिवडी पुलाला देण्याची मागणी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडे केली आहे. त्यांनी या मागणीचा विचार व्हावा असे



पत्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे .../२

# विचारांचे सोने आणि सीमोल्लंघन

अग्रलेख विचारांचे सोने आणि सीमोल्लंघन गेल्या काही वर्षांमध्ये विजयादशमी म्हणजे दसरा या महत्त्वाच्या सणाला महाराष्ट्रात दिवसभरात काय काय होणार, हे ठरून गेले आहे. सकाळी नागपूरला सरसंघचालकांचे भाषण, त्यानंतर दुपारी टळटळीत उन्हात बीड जिल्ह्यातील भगवान गडावर पंकजा मुंडे यांचे भाषण, सायंकाळी 'विचारांचे सोने लुटणारा' शिवसेनेचा दसरा मेळावा हे कार्यक्रम ठरलेले असतात. करोनामुळे यातील काहींमध्ये खंड पडला. यंदा ते सगळे झाले. नागपूरच्या दीक्षाभूमीवर याच दिवशी धर्मचक्रप्रवर्तन दिन उत्साहाने साजरा होतो. लाखो आंबेडकर भक्तांचे पाय तिकडे आपसूक वळतात. याशिवाय, कोल्हापुरातल्या 'दसरा चौका'त होणारा दिमाखदार व ऐतिहासिक परंपरा असणारा सोहळा महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेत असतो. शिवसेनेच्या दसरा मेळाव्याचे महत्त्व बरीच वर्षे आहे आणि अलीकडे शिवसेना पक्षप्रमुख व मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सकाळी नागपुरात सरसंघचालक जे बोलतील, त्याला अनुसरून सायंकाळी टीकाटिपणी करण्याची नवी प्रथा पाडली आहे. ती त्यांनी यंदाही पाळली. खरेतर, भारतीय जनता पक्षाची जननी असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आणि शिवसेनेचा 'हिंदुत्व' हा समान जिव्हाळ्याचा विषय आहे. तरीही, ठाकरे यांनी आपल्या भाषणात सत्ताधारी भाजपची संभावना 'नवहिंदू' अशी करून त्यांना 'फोडा आणि राज्य करा' अशी नीती वापरणाऱ्या इंग्रजांच्या पंक्तीला नेऊन बसवले. ठाकरे यांच्या भाषणानंतर भाजपचे अनेक नेते त्यांच्यावर एकदम तुटून पडले आणि अपेक्षित कलगीतुरा सुरू झाला. तो आता बराच काळ चालेल. यंदाच्या मेळाव्यात ठाकरे त्यांचा स्वभाव सोडून पुष्कळच आक्रमक भाषेत बोलले. त्यांच्या साऱ्या भाषणाचा अंतःस्थ रोख मुंबई महापालिकेच्या निवडणुकांवर होता. शिवसेनेचा आज मुख्यमंत्री असला तरी तिचा खरा प्राण हा महापालिकेच्या सत्तेत आहे. भाजप आणि शिवसेना यांच्यातील अंतर व दुही दिवसेंदिवस इतकी वाढते आहे की, परतीचे मार्ग जवळपास बंद होत चालले आहेत. अशावेळी, मुंबईत शिवसेनेचा खरा सामना भाजपशीच होणार आहे. गेल्यावेळीही तो तसा झाला आणि शिवसेनेला निसटताच विजय मिळाला. हे सारे लक्षात घेऊन जुने कडवे मराठीपण बाजूला ठेवून 'जात–पात, मराठी–अमराठी असे सगळे भेद गाडून' ठाकरे समावेशक हिंदुत्वाची हाळी देत आहेत. एका अर्थाने, यावेळी मुंबई महापालिकेत सेनेचे हिंदुत्व की भाजपचे हिंदुत्व असा सामना आहे. त्यातही, दोन्ही पारड्यांचा तोल साधणारे किंवा घालवणारे मनसेचे तिसरे मराठी–हिंदुत्व आहेच. हे संपूर्ण भाषण ठाकरे यांनी राज्यात शिवसेनेची एकछत्री सत्ता आहे, अशा थाटात केले आणि केंद्र सरकार व मोदींवर कडाडून टीका केली. देशात जी काही विरोधी आघाडी आकार घेणार आहे, तीत भाजपचीच हिंदुत्वाची भाषा पण अधिक चढ्या आवाजात बोलणारा पक्ष असेल तर ते 'सेक्युलर' विरोधी पक्षांच्या फायद्याचे वाटू शकते. तशी व्यूहरचना शिवसेना पक्षप्रमुख करू पाहात आहेत. तिचा पहिला ताळा आणि पडताळा मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत येईल. सत्ताधारी व विरोधी असे दोन्ही पक्ष निदान महाराष्ट्रात हिंदुत्वाची भाषा बोलत असतील तर नागपुरातच जन्म झालेल्या संघाला हे आवडायला हवे. त्यातच आता 'राष्ट्रवादी काँग्रेस'चे रोहित पवार यांच्यासारखे 'राजघराण्या'तले आमदारही जगातला सर्वांत उंच व भव्य भगवा ध्वज फडकविण्यात धन्यता मानत आहेत. राजकीय परिचर्चेत काही चलनी नाणी असतात. यातल्या 'सेक्युलर' या चलनी नाण्याची जागा 'हिंदुत्व' हे नाणे घेते आहे का, हे कळायला थोडा वेळ लागेल. मात्र, सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केंद्र सरकारकडून काही अपेक्षा पुऱ्या झाल्या असल्या तरी काही अपुऱ्या अपेक्षांचा दबाव कायम ठेवला आहे. त्यांनी दसरा भाषणात लोकसंख्येच्या प्रश्नाचा केलेला सविस्तर उल्लेख 'समान नागरी कायद्या'च्या अपेक्षेच्या दिशेने जाणारा आहे. समान नागरी कायद्याच्या छत्राखाली 'लोकसंख्येचा संभाव्य असमतोल' किंवा 'छुप्या घुसखोरी'चा मुद्दा येऊच शकतो. तसाही, ३७०, राममंदिर यांच्यासोबतचा शिल्लक राहिलेला तोच एक मुद्दा आहे. गेल्या काही वर्षांत सरसंघचालकांचे दसरा भाषण प्रत्येक महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्याला स्पर्श करते. त्यामागचा हेतू उघड आहे. मात्र, त्यामुळे त्याला सबगोलंकारी रूप येते. म्हणूनच ओटीटी, अमली पदार्थांपासून पर्यायी अर्थशास्त्रीय प्रतिमानांपर्यंत सारे त्यात येते. मोहन भागवत यांच्या नागपुरातील भाषणापासून सुरू झालेली महाराष्ट्राची दसऱ्याची विचारयात्रा षण्मुखानंद सभागृहातील मुख्यमंत्र्यांच्या आक्रमक भाषणाने संपली. कोणी कोणत्या नव्या सीमा आखून घेतल्या आहेत आणि जुन्या सीमांचे उल्लंघन कधी होणार आहे, हे आता काही काळातच महाराष्ट्राला समजेल.

# भिकू पांगारकर यांना पुरस्काराने सन्मानित ; आविष्कार फाऊंडेशन, कोल्हापूर यांचे कडून पनवेल येथे सन्मान

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील वाकलघर येथील रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळेचे प्राथमिक शिक्षक भिकू सदानंद पांगारकर यांना २०२१ मधील राज्यस्तरीय लोकराजा राजर्षी शाहू गौरव पुरस्कार प्रधान करण्यात आला आहे.

आविष्कार फौंडेशन, कोल्हापूर यांचे कडून देण्यात येणारा राज्यस्तरीय लोकराजा राजर्षी शाहू गौरव पुरस्कार पांगारकर यांना पनवेल महानगरपालिकाचे उपायुक्त सचिन पवार यांच्या शुभ हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यावेळी या पुरस्काराने महाराष्ट्र राज्यातील ३८ शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. त्याच प्रमाणे गुणवंत शिक्षक, सामाजभूषण व कोविड योद्धा अशा विविध क्षेत्रातील देशभरातून ७५ जणांना सन्मानित करण्यात आले. हा दिमाखदार पुरस्कार प्रदान सोहळा दीप सिटी पनवेल येथे संपन्न झाला.

भिकू पांगारकर यांनी प्राथमिक शिक्षक म्हणून २६ वर्षे सेवा केली असून आदर्श शाळा, प्रगत शाळा, तंबाखू मुक्त शाळा, डिजिटल शाळा, ज्ञानरचनावादी शाळा इ. उपक्रम यशस्वीपणे राबविले आहे. शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल त्यांना पुरस्कार प्रधान करण्यात आला. याच वेळी पदवीधर शिक्षक भोस्ते येथील जगन्नाथ पवार व रानवली शाळा येथील सहाशिक्षिका प्रणाली पवार यांना राज्यस्तरीय गुणवंत पुरस्कार ने गौरविण्यात आले. महत्वपूर्ण कर्तृत्वाचे मुल्यांकन म्हणून हा सन्माननीय पुरस्कार प्रदान करण्यात येत असून या पुरस्काराबाबत त्यांचे सर्वच क्षेत्रातून अभिएनंदन होत आहे.

या सोहळ्याला महाराष्ट्र राज्य लेखा समिती अध्यक्ष शहाजी क्षीरसागर, पनवेल महानगरपालिका उपायुक्त सचिन पवार, शिक्षक आमदार बाळाराम पाटील, उद्योजक मुंबई सुनील नारकर, आविष्कार फौंडेशन संस्थापक अध्यक्ष संजय पवार, कार्याध्यक्ष शिंदे त्याच बरोबर अनेक मान्यवर उपस्थित होते.




# नगरपरिषदेवर भगवा फडकविण्यासाठी युवा, युवती एकवटले

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानला विकासाच्या प्रवाहात नेण्यासाठी आणि इथल्या पर्यटनाला चालना देण्यासाठी केवळ शिवसेना हाच एकमेव पक्ष प्रगतीपथ–ावर असून अल्पावधीतच केलेल्या विकासात्मक कामांची भरारी ही उत्तुंग असून कधी नव्हे एवढी कामे मोठया प्रमाणावर मार्गी लागली आहेत. नगरपरिषदेच्या सभागृहातील गटनेते प्रसाद सावंत यांनी केवळ या पर्यटनस्थळाची भौगोलिक दृष्ट्या केलेली विकासात्मक आखणी ही खरोखरच वाखाणण्याजोगी असून त्यांच्या एकंदरीत कार्यप्रणालीवर खुश होऊन मागील दोन महिन्यांत प्रत्येक प्रभागातील युवा, युवतींनी शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारले आहे.शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी आणि शिवसेनेचे संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली मोठया संख्येने पक्षप्रवेश करण्यात आले आहेत.



स्वेच्छेने पक्षात आलेल्या समस्त युवा, युव–तींचे हसतमुखाने स्वागत झालेले असून यापुढेही नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीत भगवा एके भगवा हेच ध्येय या युवकांनी अंगिकारले आहे. राजकीय क्षेत्रात नेहमीच युवकांच्या हातात सत्तेच्या चाव्या राहिल्या आहेत.२०१६ च्या निवडणुकी मध्ये शिवसेनेची एकहाती सत्ता स्थापन करण्यात आली होती त्यावेळेस सुध्दा काहीशा प्रमाणात ही युवा पिढी सहभागी झाली होती.परंतु सध्याची राजकीय परिस्थिती पाहता शिवसेनेकडे हा जो युवा वर्ग आकर्षित होत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे प्रत्येक प्रभागात जाऊन सर्वसामान्य युवा वर्गाची अत्यंत आत्मीयतेने सखोल चौकशी करून त्यांच्या मनावर अधिराज्य प्रस्थापित करणे हे अशक्यप्राय महत्वपूर्ण काम प्रसाद सावंत यांच्या माध्यमातून आजही होत आहे याचं कारणांस्तव प्रसाद सावंत यांच्याकडे अंगीकृत असणा–या मानवी चुंबकीय शक्तीकडे आपसूकच युवा वर्ग ओढला जात आहे. त्यामुळेच भगवे वादळ लवकरच एखाद्या त्सुनामी प्रमाणे आगामी काळात येणाऱ्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत धडकणार आहे असे युवा वर्गामधून सुर निघत आहेत.

राजकारण म्हंटले की त्यात सर्व काही अभिप्रेत असते यामध्ये ओल्या सुक्या मेजवान्या होतच असतात त्यामुळे अर्थाचा अनार्थही काढला जाणे हे स्वाभाविकच असते. आणि विशेष म्हणजे पक्ष वाढीसाठी स्वतःच्या खिशाला चाट देऊन, पदरमोड करून राजकारण खेळले जाते. केवळ निवडणुका जवळ येत आहेत म्हणून वेळेनुसार खर्च करणे ही राजनीती नसते तर साम,दाम,दंड, भेद या चतुरश्रीचा वापर केल्याशिवाय राजकारण होऊच शकत नाही. प्रसाद सावंत यांचे नेहमीचेच वाक्य म्हंटले तर करेंगा खर्चा तो होगी चर्चा त्यामुळेच आजही जनसंपर्क कार्यालयात नवनवीन कार्यकर्त्यांचा भरणा आणि ही एकप्रकारे भरती वाढतच आहे. काही महिन्यांपूर्वी सेनेतील काही निष्ठावंत म्हणनारे शिवसैनिक काही कारणास्तव भाजप वासी झालेले आहेत. परंतु त्याबदल्यात गावातील युवा, युवतींची एक मोठी ताकद शिवसेनेच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. याच नव्या दमाच्या ताकदीच्या बळावर अगदी सहजपणे आपण यशाची शिखरे नक्कीच पादाक्रांत करू शकतो अन या युवा युवतींच्या स्वप्नांना गगनभरारी देत इच्छित स्थळी नेण्याची क्षमता आपल्या शिवसेनेत आहे हा दृढ आत्मविश्वास चंद्रकांत चौधरी आणि प्रसाद सावंत यांना आहे.

तर युवा सेना निमेश मेहता ( युवाअधिकारी), गौरंग वाघेला (उप युवाधिकारी), मयुरेश कदम (उप युवाधिकारी), श्रेयस गायकवाड(सचिव), अजहर खान (युवा संघटक), अक्षय सोनवणे (सह सचिव), प्रवीण बावदाणे(समनव्यक), वैभव परब / खालिद शेख (सह समनव्यक) आणि युवतींमध्ये तालुका उप अधिकारी तन्वी दिघे, युवती सेना माधुरी बिरामणे (युवती अधिकारी), ऐश्वर्या तोरणे व सुजाता कुंभार (उप युवाधिकारी), अंकिता तोरणे(सचिव), प्राची कदम (सह सचिव) हे सर्व युवा, युवती पक्ष वाढीसाठी लोकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्या प्रभावीपणे सोडविण्यासाठी अधिक मेहनत घेत आहेत.

# रस्त्यांवरील मेन होल वरील झाकणे ठरतायेत अपघाताला आमंत्रणे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

गतवर्षी सिडकोने नविन पनवेलमध्ये लाखो रुपये खर्च करुन नविन रस्ते बनविले मात्र निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यांवरील मेन होलची झाकणे रस्त्याच्या खाली गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात चारचाकी,दुचाकी गाड्यांचे अपघात होत असतात.

नविन पनवेल बांठीया शाळेसमोरिल रस्ता, सेक्टर १४ जवळील आमराईच्या रस्त्यावर तसेच सेक्टर १७ जवळील रेल्वेस्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यांवरील मेन होल वरील झाकणे तुटलेली अवस्थेत आहेत. या रस्त्यांवर गाड्यांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते .यामुळे येथिल मेन होल वरील झाकणे तात्काळ दुरुस्त करावी अशी येथिल नागरिकांनाची मागणी आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## दीड वर्षांत पूर्ण करण्याचा सिडकोचा मानस

या योजने अंतर्गत नवी मुंबई प्रकल्पबाधितांना मोबदला म्हणून त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीच्या साडे बारा टक्के विकसित जमीन देण्यात येते.

सिडकोकडून अत्यंत पारदर्शक व नियोजनबद्धरीत्या ही योजना राबविण्यात येऊन, आजतागायत नवी मुंबई क्षेत्रातील ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील बहुतांशी प्रकल्पबाधितांना किंवा प्रकल्पबाधित व्यक्ती हयात नसल्यास त्यांच्या वारसांना जमिनींचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित प्रकल्पबाधितांना या योजने अंतर्गत जमीन वाटपाची प्रक्रिया येत्या दीड वर्षात सिडकोकडून पूर्ण करण्यात येणार आहे.

सिडकोकडून द्रोणागिरी नोडमधील जमिन संपादित करण्याचे काम सुरू असून सदर जमिनींच्या मोबदल्यात तेथील प्रकल्बाधितांना जासई येथे विकसित भूखंड प्रदान करण्यात येतील. यासाठी जासई येथे उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा विकसित करण्याचे काम वेगाने सुरू आहे.

साडे बारा टक्के योजने संदर्भातील कामांसाठी सिडको मुख्यालयात येणाऱ्या नागरिकांना सोयीचे पडावे म्हणून, या योजनेचे सिडको भवन इमारतीत असलेले सातव्या मजल्यावरील कार्यालय तळ मजल्यावर स्थलांतरीत करण्यात आले असून नवीन कार्यालय हे सुसज्ज व अधिक प्रशस्त जागेत असून कार्यालयाबाहेर आसन व्यवस्था, दिव्यांग व्यक्तींसाठी रॅम्प इ. सुविधा आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह ज्येष्ठ व दिव्यांग नागरिकांनाही हे नवीन कार्यालय अधिक सोयीचे पडणार आहे.

## आघाडी करायची की नाही हा निर्णय....

आम्ही सर्वांचा आदर करतो पण जर कोणी आमचे नेते शरद पवार साहेबांचा अपमान करत असेल तर ते आम्हीच काय तर आमच्या सह असलेली युवा जन सागर ते खपवून घेणार नाही. आज ही युवा शक्तीला एक मौलिक वाक्यात आठवण म्हणून रायगड जिल्ह्याच्या जिल्हा परिषद असो पंचायत समिती असो किंवा नगर परिषद असो त्यात राष्ट्रवादीचा झंझावात कुणी ही रोखु शकत नसल्याचे शेवटी म्हणाले.

या कार्यक्रमात पालकमंत्री ना.आदिती तटकरे सह जिल्हाध्यक्ष नाजिम हसवरे, जिल्हा युवती अध्यक्षा सायली दळवी, युवती तालुका अध्यक्षा रविना मालुसरे आदी सहा तालुका अध्यक्षांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक आ. अनिकेत तटकरे यांनी केले तद्नंतर पालकमंत्री ना.आदिती तटकरे ,आमदार सुनील शेळके, आमदार निलेश लंके व खासदार सुनील तटकरे आदींनी युवकांना मार्गदर्शन केले रायगड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा हा पहिला युवक मेळावा ना भुतो ना भविष्याती अभूतपूर्व असा कार्यकर्तेच्या उपस्थित संपन्न झाला.

## शिवडी–न्हावा सागरी सेतूला बॅ. अंतुले यांचे नाव द्यावे : महेंद्र घरत

यांना दिल्याचे अधिकृत सूत्राकडून समजते.

रायगड जिल्ह्यात अनेक मोठमोठे प्रकल्प आणून जिल्ह्यातील तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. त्याचबरोबर कुलाबा जिल्ह्याचे नाव बदलून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावनभूमीचे म्हणजे रायगड जिल्हा असे केले. तसेच त्यांनी मुख्यमंत्री असताना अनेक धाडसी निर्णय घेऊन रायगडचा कॅलिफोर्निया बनविण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. परंतु अल्पावधीतच त्यांना पदावरून जावे लागल्याने ते स्वप्न अधुरे राहिले आहेत. तसेच केंद्रीयमंत्री असतानाही जिल्ह्यासाठी अनेक धाडसी निर्णय घेतले होते. त्याचा फायदा जिल्ह्याबरोबर देशातील जनतेलाही होत आहे. असे धाडसी नेतृत्व फक्त जिल्ह्यापुरतेच मर्यादित नव्हते तर ते राष्ट्रीय पातळीवरचे नेते म्हणून समजले जात होते.

असे जनमानसांचे नेतृत्व असलेल्या बॅ. ए. आर. अंतुले यांचा यथोचित सन्मान व्हावा यासाठी त्यांचे नाव न्हावा शिवडी पुलाला देण्यात यावे अशी मागणी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी राज्याचे महसूलमंत्री व काँग्रेसचे जेष्ठनेते बाळासाहेब थोरात यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे. मंत्री बाळासाहेब थोरात यांनीही याचे समर्थन करीत या मागणीचा विचार व्हावा असे पत्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दिले आहे. जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या या मागणीचे जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्याकडून स्वागत होत आहे. त्याचबरोबर ही मागणी लवकरात लवकर पूर्ण होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# आर्या वनौषधी संस्थेतर्फे आपटा वृक्षाची रोपे देवून दसरा सण साजरा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आर्या वनौषधी संस्थे तर्फे आपट्याची पाने सोनं म्हणून एकमेकांना भेट न देता आपटा वृक्षाची रोपे भेट देवून दसरा सण मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

साडेतीन मुहूर्ता पैकी एक असलेल्या दसरा या सणाचे औचित्य साधून आर्या वनौषधी संस्थेने आपटा या वृक्षाची १०१ रोपे भेट देवून एक आगळा वेगळा उपक्रम राबविला.या वेळी संस्थेचे दत्तू कोल्हे यांनी आपटा या वृक्षा बद्दल माहिती असलेली पत्रके व आपटा या वृक्षाच्या औषधी गुणधर्माची माहिती वनौषधी प्रेमींना दिली.

आज आपल्याकडे वृक्ष संवर्धना बद्दल चांगली जनजागृती होत आहे.दसऱ्याला आपट्याच्या पाना सोबतच आपट्याची रोपे भेट दिल्यास व आपट्याची रोपे लावल्यास नक्कीच या वनौषधीचे चांगले संवर्धन होईल असे वनौषधी संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील यांनी यावेळी सांगितले.गेल्या दहा वर्षापासून वनौषधी तज्ञ सुधीर पाटील आपट्याची जास्तीत जास्त रोपे तयार करून वाटप करण्याचे काम करत असून या वृक्षाचे बी सुद्धा ते वनौषधी प्रेमींना भेट देत आहेत असे या वेळी दत्तू कोल्हे यांनी सांगितले.

# सह्याद्री प्रतिष्ठान तर्फे मर्दनगडावर दसरा साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचार व कार्याचा प्रसार, प्रचार करणाऱ्या, गड किल्ले यांचे संवर्धन, संरक्षण करणाऱ्या सह्याद्री प्रतिष्ठान मार्फत दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात राबविले जातात.त्याच अनुषंगाने सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्तान, उरण विभागा मार्फत सालाबाद प्रमाणे दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर गडपुजन व शस्त्र पूजनाचा कार्यक्रम करण्यात आला.

आवरे गावालगत असलेल्या ऐतिहासिक तटबंदी वर ज्या वास्तूला किल्याचा डोंगर किंवा मर्दनगड म्हणून संबोधल जाते. त्या ठिकाणी हा कार्यक्रम आयोजित केला होता. सकाळी १० वाजता आवरे गावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात केली.

उरण तालुक्यातील नवोदित शाहीर उमंग भोईर यांचा सुमधुर वाणीतून पोवड्याने वातावरण निर्मिती झाली. त्या नंतर तटबंदी वर गडपूजन व शस्त्र पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त कौशिक ठाकूर यांनी भूषविले. कार्यक्रमासाठी उरण तालुक्यातील २५ शिवभक्त व आवरे गावातील ग्रामस्थ हजर होते.

गड पूजनाच्या कार्यक्रमानंतर आ–वरे गावातील भोलेनाथ मंदिरात शालेय विद्यार्थी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत शाहीर उमंग भोईर यांचा पोवड्यांचा कार्यक्रम झाला व कार्यक्रमाची सांगता केली.कार्यक्रमा दरम्यान सह्याद्री प्रतिष्ठान मार्फत शाहीर उमंग भोईर व कौशिक ठाकूर यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाची सूत्रसंचालन संघटनेचे माजी अध्यक्ष नीलेश ठाकूर यांनी केले तर या ऐतिहासिक वास्तू बद्दल इतिहास अभिषेक ठाकूर व कौशिक ठाकूर सर यांनी उस्थितांना सांगितला व या वास्तूचे जतन, संवर्धन करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निश्चय केला गेला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## शिहू बेणसे विभागातील पाच खेळाडूंची चमकदार कामगिरी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यातील शिहू बेणसे विभागातील खेळाडू उरी जिद्द बाळगून कठोर परिश्रम व सातत्यपूर्ण सरावातून राष्ट्रीय स्थरावर सक्षमपणे नेतृत्व करण्यास सज्ञ झालेत. शिहू बेणसे विभागातील पाच खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली असून त्यांची राष्ट्रीय वॉटर पोलो स्पर्धेकरिता निवड झाल्याने या खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होतोय.स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने ४७ वी राष्ट्रीय जल–तरण, वॉटर पोलो, ड्रायव्हिंग स्पर्धा दिनांक १९ ते २३ ऑक्टोबर २०२१ रोजी बेंगलोर येथे होणार आहे. या स्पर्धे करिता स्विमिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने डेक्कन जिमखाना जलतरण तलाव पुणे येथे खुली निवड चाचणी घेण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये रिलायन्स फाउंडेशन च्या रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे हेल्थ क्लब मधील जलतरण तलावाचे जलतरणपटू भारत चंद्रकांत कुथे, ओंकार अनंत माळी, साहिल सुरेश कुथे, सार्थक मारुती इन्द्रे, प्रेषिता तरे या पाच खेळाडूंची दिनांक ५ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर पर्यंत झालेल्या वॉटर पोलो प्रशिक्षण शिबिरासाठी निवड करण्यात आली होती.

हे खेळाडू जलतरण क्षेत्रात अपार मेहनत घेत उल्लेखनीय कामगिरी करीत आहेत. त्यांच्या या उत्तुंग यशाने बेणसे झोतिरपाडा विभागासह जिल्ह्याचे नावलौकीकात भर पडत आहे. हे प्रशिक्षण शिबिर डेक्कन जिमखाना पुणे येथे इंडिया वॉटरपोलोचे प्रशिक्षक श्री दत्ताराम तरे, व श्री शौर्य करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. दरम्यान प्रेम राज पाटील या खेळाडूची देखील जिल्हा स्पर्धेसाठी निवड झालीय. या पाच खेळाडूंना राष्ट्रीय स्थरावर नेतृत्व करण्याची सुवर्ण संधी प्राप्त झाली आहे.

या खेळाडूंच्या अभूतपूर्व यशाचे बेणसे ग्रामपंचायतीचे सरपंच मधुकर पारधी, सामाजिक कार्यकर्ते उद्धव कुथे, माजी सरपंच सौ.प्रीती कुथे, कामगार नेते अरुण कुथे, यशवंत महादेव कुथे, चंद्रकांत काशीनाथ कुथे, राजेश गोरे, आदींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ३२५ सफाई कामगारांना मिळणार पंतप्रधान आवास योजनेत मोफत घरे

## पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ; २५ वर्षे सेवा केलेल्याना प्राधान्य

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील झोपड़पट्टी पुनर्वासन यासाठी पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मजूर झालेल्या प्रकल्पाच्या योजनेतून पनवेल महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या सफाई कामगारांना शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना मोफत घरे देण्याचा प्रस्ताव पालिके कडून तयार आला असून या प्रस्तावावर पालिकेच्या सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. या योजने मार्फत ३२५ कामगारांना घरे अगदी मोफत मिळणार आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या स्थापने नंतर अवघ्या पाच वर्षांच्या कालावधी नंतर, नव्याने विकसित होणाऱ्या पालिकेच्या ड्रीम प्रोजेक्ट्स पैकी आवास योजना ही आता साकारण्यात येणार आहे. त्या साठी आवश्यक असणाऱ्या बाबी पूर्ण करण्यात आल्या असून हा प्रस्ताव पालिकेच्या महासभेत मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे. या पंतप्रधान आवास योजने उभा करण्यात येणाऱ्या सदनिका या झोपडपट्टी पुर्नवसनासाठी असणाऱ्या आहेत. तसेच काही सदनिका या आता पनवेल महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या ३२५ सफाई कामगारां साठी



### २९६ चै. फूट ची मिळणार मोफत घरे

पनवेल महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या ३२५ सफाई कामगारांना पालिकेच्या माध्यमातून उभा करण्यात येणाऱ्या पंतप्रधान आवास योजने मध्ये २९६ चै. फूट क्षेत्राच्या सदनिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजने अंतर्गत अगदी मोफत देण्यात येणार आहे. त्या साठी पालिकेच्या मार्फत काही नियमावली घोषीत करण्यात आली आहे.

राखीव ठेवण्यात येणार आहे. या कामगारांना अगदी मोफत घरे दिली जाणार आहे. त्या साठी २५ वर्ष सेवा ज्या कामगारांची झाली आहे. आणि

### २५ वर्ष सेवा झालेल्या कामगारांना मालकी तत्वावर देण्याचा प्रस्ताव

पालिकेच्या सेवेत असलेल्या ३२५ सफाई कामगारां पैकी ४५ कामगारांना मालकी तत्त्वावर ही घरे देण्याचा प्रस्ताव आहे. तर २५ वर्ष्या पेक्षा कमी सेवा झालेल्या ५५ कामगारांना भाडे तत्त्वावर घरे देण्यात येणार आहे. या कामगारांची सेवा २५ वर्ष पूर्ण झाल्या नंतर ही घरे त्याच्या मालकी हक्कांची होणार आहे.

ही सेवा देतांना तसेच सेवा निवृत्ती च्या वेळेस जे कामगार मृत पावले आहेत. अश्या पात्र मृतांच्या वारसांना ही घरे देण्यात येणार आहे. २५ वर्ष सेवा झालेल्या कामगारांना मालकी तत्त्वावर घरे देण्यात येणार आहे. तर २५ वर्ष्या पेक्षा कमी सेवा झालेल्या कामगारांना भाडे तत्त्वावर घरे देण्यात येणार आहे. हे भाडे २५ वर्ष सेवा पूर्ण झाल्या नंतर बंद होऊन ही घरे मालकीचे होणार आहे. ही मोफत घरे देण्यासाठी डॉ. बाबसाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजने चा वापर करण्यात येणार आहे.या योजने अंतर्गत एका कामगारांच्या मागे पालिकेला ४ लाख २५ हजाराचा अनुदान मिळणार आहे. या अनुदाना वेतरीक्त येणारा खर्च पालिका स्वतः करणार आहे. त्या मुळे पालिकेवर ९७१.२७ कोटीचा आर्थिक बोजा पडणार आहे. तसेच काही कामगारांना पंतप्रधान आवास योजने मधून अडीच लाखाचे अनुदान मिळणार आहे. हा प्रस्त्वा पालिके कडून तयार करण्यात आला असून पालिकेच्या महासभेत मंजूरी साठी ठेवण्यात येणार आहे. पालिकेच्या मंजुरी नंतर महाराष्ट्रा शासन दरबारी अंतीम मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे.

### पालिकेवर पडणार ९७१.२५ कोटींचा आर्थिक बोजा

या योजने अंतर्गत १०० कामगारांना सदनिका देण्यात देणार आहे. त्यासाठी १३०० लाखाचा खर्च येणार आहे. त्या पैकी या सदनिकाना आवास योजने मार्फत मिळणाऱ्या ४.४५ लाखाचे अनुदान मिळणार आहे. या अनुदाना मधून पालिकेला ३२८.८५ रुपयांचे अनुदान मिळणार आहे. ही रक्कम वजा करता ९७१. २५ कोटींचा आर्थिक बोजा पालिकेवर पडला आहे.

# नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांचा वाढदिवस साधेपणाने साजरा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरीच्या विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांचा वाढदिवस अत्यंत साधेपणाने जनसंपर्क कार्यालयात साजरा करण्यात आला. त्यांनी आपल्या कार्यकाळात केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल उपस्थित महिला आघाडीच्या सर्व सदस्यांनी त्यांना पुढील काळात निरोगी आणि दीर्घायुष्य लाभावे यासाठी मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित महिला आघाडी तसेच नव्याने स्थापन करण्यात आलेल्या युवती सेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि महिला आघाडी शहरसंघटक संगिता मनोज जांभळे यांच्या हस्ते शिवबंधन बांधण्यात आले. यावेळी प्रिती संतोष कळंबे (महिला आघाडी संपर्कसंघटक), संगिता मनोज जांभळे( महिला आघाडी शहरसंघटक), समीना फजल महापुले (महिला आघाडी उपशहर संघटक), युव–तीसेना कर्जत तालुका उप तालुका युवती अधिकारी तन्वी डीगे, माधुरी बिरामने (युवती अधिकारी)ऐश्वर्या तोरणे व सुजाता कुंभार (उप युवाधिकारी), अंकिता तोरणे (सचिव), प्राची कदम (सह सचिव) यांसह अन्य महिला आघाडीच्या सर्वच निष्ठावंत अन कट्टर सदस्या उपस्थित होत्या.



# उरणच्या दासभक्तानी केली झाडांच्या भोवतालची झुडपे व गवतांची सफाई

**दै.रायगड नगरी । उरण**

चिरनेर – विंधणे महामार्गाच्या जवळ असलेल्या वन क्षेत्रात ओसाड टेकडीवर विविध जातींच्या झाडांची लागवड व संवर्धन करण्याचे काम डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने उरण तालुक्यातील दासभक्तांनी हाती घेतले आहे. या झाडांच्या अवतीभोवती पावसाळ्यात वाढणारी झुडपे आणि गवतामुळे उन्हाळ्याच्या दिवसात आग लागण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे येथील वृक्षे जळून नष्ट होणार नाहीत, यांची खबरदारी म्हणून उरण तालुक्यातील दासभक्तानी काल झाडांच्या भोवती वाढलेली झुडपे आणि गवत काढण्याचे काम हाती घेतले आहे.




उरण तालुक्याच औद्योगिककरण झपाट्याने वाढत आहे.अशा वाढत्या औद्योगिकिकरणामुळे व ओसाड टेकडी, डोंगरामुळे झपाट्याने नागरीकांना, पशुपक्षांना आवश्यक असलेल्या ऑक्सिजनचा तुडवडा निर्माण होऊन वातावरणातील प्रदुषणात वाढ होत आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना, पशुपक्ष्यांना मोकळा श्वास घेता यावा तसेच जंगलातील पशुपक्ष्यांना अन्न उपलब्ध व्हावे यासाठी उरण तालुक्यातील दासभक्तानी डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडाच्या माध्यमातून चिरनेर – विधणे महामार्गावरील ओसाड टेकडीवर विविध जातींच्या झाडांची लागवड करण्याचा संकल्प केला. आणि पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आंबा, काजू, फणस, जांभूळ, पेरु, वर इतर विविध जातींच्या झाडांची लागवड केली.

ओसाड टेकडीवर लागवड करण्यात आलेल्या झाडांवरील फळे खाण्यासाठी तसेच निवारा घेण्यासाठी विविध जातींचे पक्षी, फुलपाखरे,ससा व इतर वन्य प्राणी मुक्त संचार करत आहेत. परंतु काही नागरीक या टेकडीवर उन्हाळ्यात आग लावून स्वतःचा स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे अशा झाडांचे संवर्धन, जतन करण्यासाठी व उन्हाळ्यात लागणाऱ्या आगीतून सुटका करण्यासाठी उरण तालुक्यातील दासभक्तानी सदर टेकडीवर पावसाळ्यात वाढलेले गवत काढण्याचे काम एकदिलाने हाती घेतले. एकंदरीत दासभक्तांच्या या समाजाभिमुख कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सामाजिक संस्था, विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सहभाग घेऊन हात भार लावला तर गावा, गावा–तील ओसाड टेकडीवर नंदनवन फुलण्यास वेळ लागणार नाही.अशी प्रतिक्रिया जनमानसात व्यक्त केली जात आहे.

# भाज्यांचे भाव कडाडल्याने गृहिणींचे बजेट कोलमडले

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

परतीचा पाऊस जास्त प्रमाणात पडल्याने शेतामध्ये असलेल्या भाज्या कुसून गेल्या आहेत. परिणामी भाज्यांची आवक कमी झाली आहे. भाज्यांची आवक कमी होत असल्यामुळे भाज्यांचे भाव देखील मोठ्या प्रमाणावर कडाडलेले पाहायला मिळत आहेत.



भाज्यांचे भाव कडाडले असल्यामुळे गृहिणींचे बजेट कोलमडले आहे. नेहमी २५ ते ३० रुपये किलो मिळणारे टोमॅटो सध्या ६० ते ८० रुपये किलो दराने विकले जात आहेत. गवार १२० रुपये किलो विकली जात आहे. कोथिंबीर जुडी ८० रुपयांवर जाऊन पोचली आहे. सिमला मिरची, फ्लॉवर त्याचप्रमाणे फरसबी यांचे भाव देखील मोठ्या प्रमाणावरती वाढलेले दिसत आहेत. वांगी, कोबी, हिरवी मिरची, आले, लिंबू यांच्या किमती मध्ये देखील मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. लसूण दोनशे रुपये किलोने विकली जात असून कांदा ६० रुपये किलो झाला आहे. तर बटाटे ३० रुपये किलो झाले आहेत. श्रीवर्धन तालुक्यात आता पावसाळा संपत आल्याने स्थानिक पिकणार्या भाज्या देखील बाजारात येत नसल्याने गृहिणींना भाजीच्या दुकानातूनच भाजी खरेदी करावी लागत आहे. परंतु भाज्यांचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे गृहिणींचे बजेट मात्र कोलमडलेले पाहायला मिळत आहे. भाज्यांचे भाव वाढल्यामुळे भाजीविक्री मध्ये देखील मंदी आल्याचे भाजी विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

# राष्ट्रवादी युवा काँग्रेसतर्फे चणेरा गावची स्वच्छता

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

चणेरा येथील राष्ट्रवादी युवा काँग्रेस तर्फे दि,१७। १०। २०२१ रोजी संपूर्ण चणेरा गाव व मंदिराची स्वच्छता करण्यात आली.

चणेरा गावचे भावी युवा सरपंच तसेच राष्ट्रवादी काँग्रेस रोहा तालुका युवा संघटक श्री मयुरशेठ मनोहरराव विचारे यांच्या अध्यक्षतेखाली चला युवा घडवू या नवे पर्व युवा सर्व या घोषवाक्याच्या अनुशंगाने चणेरा गावातील सर्व युवकांच्या मदतिने ही स्वच्छता गावात करण्यात आली. तसेच गावातील प्रसिद्ध व नवसाला पावणारा बापदेवजी आराध्य ग्रामदैवत यां मंदीराची स्वच्छता व रोशनाई करण्यात आली तसेच चणेरा गावामध्ये स्वच्छता जनजागृती रॅली काढून स्वच्छतेचे महत्त्व गावकऱ्यांना सांगितले लोकांसह भागातुन ग्राम स्वच्छता करता येते हे या युवकांनी दाखवून दिले आहे.

या स्वच्छता अभियानामध्ये चणेरा गावातील युवक , हर्षद सालवी, ओमकांर जोशी, रोहीत पवार, अनिकेत मयेकर, सुहास गंभे,मानव सालवी, यश काटे, आशिष देसाई, सौरभ मनहास,हर्षद ढोळे,दर्शन गंभे, सर्वेश आरेकर, दीप चालते, संस्कार सालवी, दिगंबर जाधव, रोशन गंभे, प्रतम तेलंगे , हितेश खैरे, राज देसाई, आदि युवकांनी गावाची स्वच्छता पूर्ण करून एक नवा इतिहास चणेरा पंचक्रोशीत निर्माण केला आहे, त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# चिरनेर येथे शेती विषयक कार्यशाळा मेळावा संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील प्राथमिक केंद्र शाळेच्या सभागृहात कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत कौशल्य आधारित शेतमजूर प्रशिक्षण वर्ग व प्रधानमंत्री अन्नप्रक्रिया योजना संदर्भात शेतकऱ्यांसाठी शेती विषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.भात तयार होण्याच्या अवस्थेत असताना भाताच्या लोंब्यांवर पडणाऱ्या रोगाची संपूर्ण माहिती व त्यावर करावयाचे उपचार काय व कसे करायचे त्याची संपूर्ण माहिती उपविभागीय कृषी अधिकारी श्री ताटे यांनी दिली तद्नंतर उरण तालुका कृषी अधिकारी शर्मिला जाधव यांनी आळी रोग कसा तयार होतो व इतर वेगवेगळे रोग कसे तयार होतात आणि ते शोधायचे कसे यावर सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर व्यासपीठावर जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी, उरण पंचायत समितीच्या उपसभापती शुभांगी पाटील सरपंच संतोष चिर्लेकर ग्रामपंचायतीचे सदस्य रमेश फोफेरकर, सदस्या संध्या ठाकूर, कृषि मित्र शेतकरी प्रफुल्ल खारपाटील कृषी पर्यवेक्षक एन. वाय. घरत पनवेलचे कृषिनिष्ठ शेतकरी सज्ञन पवार विश्वनाथ थवळ कृषी सहाय्यक के.पी.म्हात्रे, डी .टी केणी, उमेश गाताडी आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे स्व–ागत कृषि मित्र शेतकरी प्रफुल्ल खारपाटील व कृषी सहाय्यक के.पी. म्हात्रे यांनी केले त्यानंतर शेती कार्यशाळेला सुरुवात झाली.या कार्यक्रमाला उरण तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी हजेरी लावली होती.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, मौजे : पुष्पकनोड, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली भूखंड मिळकतीमध्ये १) श्री.सिताराम श्रावण म्हात्रे, २) श्रीम.सुमन राम वास्कर, ३) श्रीम.शारदा केशव भोईर, ४) श्रीम.गुणाबाई अनंत पाटील यांचा असलेला हिस्सा आमचे अशिल १) श्री.मारुती दत्तू म्हात्रे व २) श्री.आत्माराम उर्फ आप्पा दत्तू म्हात्रे ३) श्रीम.चांगुणाबाई गजानन पाटील यांचे लाभांत कायमस्वरुपी मे.सब रजिस्ट्रार साहेब पनवेल यांच्या कार्यालयातून नोंदणीकृत हक्कसोडपत्राने देणार आहेत. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**भूखंडाचे वर्णन**

**मौजे : पुष्पकनगर, ता.पनवेल, जि.रायगड**

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्रफळ (चौ.मी.) | सिडको फाईल क्र. |
|---|---|---|---|---|
| पुष्पकनगर | २९ | ०३ | ५६० चौ.मी. | OWA-103 (ओवळे–१०३) |

वर नमूद केलेल्या भूखंडामध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तीचा कोणत्याही संस्थेचा, कंपनी, फर्म, भागीदारी संसी यांचा मालकी हक्क गहाण, दान, बक्षिस, विक्री, खरेदीखत, साठेकरार, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात.

सदर मुदतीत कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तीचा कोणत्याही संस्थेचा, कंपनी, फर्म, भागीदारी संस्था अगर अन्य कुणाचीही हरकत न आल्यास सदरचे भूखंड निर्वेध असल्याचे समजून आमचे अशिल योग्य त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून सदर भूखंड मिळकतीचा हक्कसोडपत्र दस्त करून घेतील याची नोंद घ्यावी. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१८/१०/२०२१

सही/–
ॲड.प्रदीप श. म्हात्रे
बी–१०४, पहिला मजला,
पायोनिअर को.ऑ.हौ.सो.लि.,
स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील व्यक्तीचे मालकीचा व ताबेकब्जातील खालील वर्णनाची जमीन आमचे अशिल मे.पलचिन बिल्डटेक तर्फे भागीदार १) श्री.चिंतन नरेंद्रभाई मकवाना २) सौ.पल्लवी चिंतन मकवाना पत्ता : १०१, खोडल धाम, भूखंड क्र.५३, सेक्टर १९, कामोठे नोड, नवी मुंबई यांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**१) श्री.विनायक मुकूंद कर्वे २) श्री.विष्णू गणेश कर्वे यांचा मालकीची**

**मौजे : पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| पळस्पे | १२७/अ/१/३ | ०–०५–६० | ०.७२ |
| | १२७/अ/१/४ | ०–०५–०० | ०.१७ |
| | १२७/अ/१/६/अ | ०–०२–३० | ०.५४ |
| | १२७/अ/२ | ०–००–८० | ००.०० |
| | १२७/अ/१/२ | ०–०१–०० | ०.१७ |
| | १२७/अ/१/७ | ०–०३–८० | ०.७५ |
| | एकूण | ०–१८–५० | २.३५ |

सबब वर नमूद जमिनीवर कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळवहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस चार्ज लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत हक्क हितसंबंध स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्या पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा, हितसंबंध नाही असे समजून आमचे सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारचा हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १६/१०/२०२१

सही/–
ॲड.करण रघुनाथ देशमुख
१०१, खोडाल धाम,
भूखंड क्रं.५३, सेक्टर १९,
कामोठे, नवी मुंबई–४१०२०६



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : रिस, ता.खालापूर येथील खालील वर्णनाची बिनशेतीजमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरात नमूद असलेल्या जमीन मालकांकडून तसेच सदर जमिनीवर बांधण्यात आलेल्या आर.सी.सी. घर मिळकत ज्यास ग्रुप ग्रामपंचायत वासांबे, मोहोपाडा यांचेकडील मिळकत नं.५९७ च्या असेसमेंट दप्तरी नमूद जमीन मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : रिस, ता.खालापूर, जि.रायगड येथील**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री.अजय भालंचद्र मरकळे व सौ.अंजली अजय मरकळे | ३०/४/ब/१० | भोगवटादार वर्ग १ | ५.०३.०० | ५०.३० |

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : रिस, ता.खालापूर, जि.रायगड येथील**

| जमीन मालकाचे नाव | गाव | मिळकत नंबर | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| श्री.अजय भालंचद्र मरकळे व सौ.अंजली अजय मरकळे | रिस | ५९७ (जुना मिळकत नं.६२) | आर.सी.सी. घरत | २२८.९० चौ.मी. |

सदरहू मिळकतीवर कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, एम.ओ.यु., बोजा, साठेकरार, वचन चिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्त खत, खरेदीखत, मृत्यूपत्र, गहाण–दान, बक्षिस, लिज, लिन, पोटगी हक्क, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत योग्य त्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे समजून आमचे अशिल सदरहू मिळकतीबाबत खरेदी–विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

दि.१८/१०/२०२१

सही/–
ॲड.विकास अशोक बडे
बी.ए.एल.एल.बी.
वकील उच्च न्यायालय

ऑफिस : गाळा नं.१, समर्थ शिवराम मार्केट, मेन बाजार पेठ, मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड–४१०२२२
मो.नं.९६६५१९७२३१, ८८८८१३३४०२

# संक्षिप्त...

## विदेशी सिगारेट केल्या हस्तगत

दै.रायगड नगरी । पनवेल

विदेशी सिगारेट विक्री करण्यास बंदी असतानाही त्याची विक्री करणाऱ्या एका विक्रेत्याविरूद्ध आमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखेने कारवाई करून त्याच्याकडून जवळपास ६ हजारांच्या विदेशी सिगरेट हस्तगत केल्या आहेत. कळंबोली वसाहतीतील से.-१४ सिद्धी सोसायटी या ठिकाणी संदिपकुमार राम खेलावन गुप्ता हा बेकायदेशिररित्या विदेशी सिगरेटचा साठा करून विक्री करत असल्याची माहिती नवी मुंबई अमली पदार्थ विरोधी पथकास मिळताच त्यांनी सदर ठिकाणी छापा टाकून ६ हजारांच्या विदेशी सिगरेट हस्तगत केल्या आहेत व त्याच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## गळफास घेऊन आत्महत्या

दै.रायगड नगरी । पनवेल

अज्ञात कारणावरून एका २७ वर्षीय तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील सांगडे गावात घडली आहे. येथे राहणाऱ्या अनिल भोपी याने पहाटेच्या वेळी अज्ञात कारणावरून घरातील लाकडी जिन्याला बेडशिटच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## गोशीन रियूच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर निवड

दै.रायगड नगरी । उरण

जिल्हा स्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत आर्मीचर किक बोसक्सिन्ग असोशिएशन वाको गोशीन रियू कराटे च्या विद्यार्थ्यांनी विविध गटात भाग घेतला होता.त्यामध्ये अनेकांनी घवघवीत यश प्राप्त केले.

अनिश पाटील, अमिता घरत, अमिषा घरत,रोहित घरत, समीक्षा पाटील नेहा पाटील, सुजित पाटील, अर्णव पाटील, शुभम ठाकूर, यांनी गोल्डमेडल पटकाविले.त्यांची निवड अहमदनगर येथे २३ ते २४ ऑक्टोंबर २०21 रोजी होणाऱ्या राज्य स्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तूमन्ना गावंड, श्रुती म्हात्रे, श्लोक ठाकूर सिल्व्हर मेडल तर अंश म्हात्रे व अमर घरत यांनी ब्रॉन्झ मेडल पटकाविले. तसेच तिथे जिल्हा स्तरीय पंच परीक्षा घेण्यात आली त्यामध्ये अमिता घरत, अमिषा घरत, अनिश पाटील मानसी ठाकूर, रोहित घरत,शुभम ठाकूर गोपाळ म्हात्रे,संतोष मोकल,शुभम म्हात्रे, कमलाकर म्हात्रे,कंकेश गावंड, प्रीतम मोकळ,पंच परीक्षेत उत्तीर्ण झाले.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# माथेरानमधील युनियन बँकेच्या गलथान कारभारामुळे व्यापाऱ्यांचा उपोषणाचा इशारा

दै.रायगड नगरी । माथेरान

अनेक वर्षांपासून कार्यरत असणारी येथील एकमेव नेशनलाईज युनियन बँकेच्या काही वर्षांपासून अनियमित सेवा त्याचप्रमाणे एटीएम मध्ये पुरेसा पैसा उपलब्ध नसतो नेटवर्किंगचा त्रास त्याचप्रमाणे ग्राहकांना अपेक्षित कामे पूर्ण केली जात नाहीत. बहुतांश पर्यटक हे इथल्या एटीएमच्या भरवशावर रोख रक्कम आणत नाहीत. त्यामुळे त्यांना बाजारपेठ मधून काहीही खरेदी करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या बँकेच्या अनागोंदी पणामुळे व्यापारी वर्गाला सर्वाधिक फटका बसत आहे. कोरोना काळानंतर नुकताच हे पर्यटनस्थळ सुरू करण्यात आल्यामुळे अनेकांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या परंतु येणाऱ्या पर्यटकांना एटीएममधून पैसे काढता येत नाहीत.त्यामुळे पर्यटकांना तसेच व्यापारी वर्ग मोलमजुरी करणारे यांना खूपच त्रास सहन करावा लागत आहे.



गेल्या अनेक कालावधीपासून युनियन बँक ऑफ इंडिया माथेरान शाखेच्या गलथान कारभाराविरोधात माथेरान व्यापारी वेल्फेअर असोसिएशन तर्फे निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये व्यापारी बंधू आणि नागरिकांना बँकेच्या कामाकरिता होत असलेला त्रास दूर नाही केला तर येत्या मंगळवार दि. २६ ऑक्टोबर रोजी बँकेच्या विरोधात श्रीराम मंदिर चौक माथेरान येथे उपोषण करण्यात येईल अशा आशयाचे पत्र माथेरान व्यापारी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष राजेश चौधरी यांच्या वतीने देण्यात आले. दिवाळी पर्यटन हंगामापूर्वी येथील बँकेचे कामकाज सुरळीत व्हावे व ग्राहकांना होणारी गैरसोय दूर करावी असेही सांगण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष राजेश चौधरी, भाजपचे विद्यमान नगरसेवक चंद्रकांत जाधव, कुलदीप जाधव, प्रतिक ठक्कर, तुकाराम भोसले, विकी कदम, निसार महापुळे आदी व्यापारी बंधू उपस्थित होते.

> माथेरान मध्ये बीएसएनएल नेटवर्किंगची सर्वात समस्या असून याबाबत आम्ही कर्जत येथील संबंधित कार्यालयात चौकशी केली असता केबल तुटल्या आहेत त्यामुळे प्रॉब्लेम होत आहेत असे सांगण्यात येते. एटीएम मध्ये आम्ही पुरेसे पैसे उपलब्ध करून देत आहोत परंतु नेटवर्किंग नसल्याने ग्राहकांना पैसे काढता येत नाहीत. व्यापारी वर्गाने उपोषणाबाबतीत निवेदन सादर केले आहे त्याबाबत आम्ही आमच्या वरिष्ठांना कळविले असून लवकरच दोन दिवसात ते इथे येऊन निवेदन देणाऱ्या व्यक्तींशी चर्चा करणार आहेत.
>
> **शिशिर डोंगरे, शाखाधिकारी युनियन बँक ऑफ इंडिया, माथेरान**

# राजिपच्या चांदे आदिवासीवाडी शाळेत अन्न दिन साजरा

## माणगांव तालुका पत्रकार सेवा संघ व अंकुर फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

दै.रायगड नगरी । माणगाव

दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक अन्न दिन साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेने जागतिक अन्न दिन हा उपक्रम सुरू केला. उपासमारी पिडीतांना मदत तसेच अन्नाचे महत्व सर्वांना सांगणे हा जागतिक अन्न दिनाचा उद्देश आहे. 'आमची कृती आमचे भविष्य, चांगले उत्पादन, पोषण, वातावरण आणि चांगले जीवन' अशी यावर्षीच्या अन्न दिनाची थीम लक्षात घेऊन माणगांव तालुका पत्रकार सेवा संघ व अंकुर फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील निजामपूर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या चांदे आदिवासी वाडी शाळेतील तसेच अंगणवाडीतील मुले जवळपास शंभर गोरगरीब विद्यार्थ्यांना अन्नदान दिनाचे औचित्याने शनिवार दि. १६ ऑक्टोबर रोजी अन्नदानाचा अतिशय स्तुत्य उपक्रम पार पाडला आहे.

यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवृंद तसेच पत्रकार संघ व अंकुर फाउंडेशन च्या सर्व सदस्यांनी एकत्रितपणे विद्यार्थी पंगतीला दुपारचे जेवण व गोड खाऊचे वाटप केले. यानंतर सर्वांनी आदीवासी विद्यार्थ्यां सोबत सह-भोजनाचा आनंद देखिल घेतला. सर्व मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता, मनसोक्त जेवण जेवुन मुले तृप्त झाल्याचे एक वेगळे समाधान या निमीत्ताने येथे उपस्थितांना अनुभवायास मिळाले.



अन्नदान हेच श्रेष्ठ दान असा हा उपक्रम पार पडला.

तत्पूर्वी शाळेच्या केंद्र प्रमुख नरेंद्र खैर यांनी या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन सहर्ष स्वागत केले या कार्यक्रमास निजामपूरचे सरपंच राजाभाऊ रणपीसे यांनी देखिल विशेष भेट दिली.

कार्यक्रम प्रसंगी पत्रकार सेवा संघाचे अध्यक्ष रविंद्र कुवेसकर यांनी अन्नदान दिना निमीत्त विद्यार्थ्यांशी संवाद साधत, स्वच्छता व हात धुण्याचे महत्व तसेच चांगले वाईट संस्कार विषयक माहीती दिली व या आदिवासी शाळेतील विद्यार्थी यांचा निटनेटकेपणा व शाळेतील सुंदर परिसर व स्वच्छते विषयी कौतुक केले. अंकुर फाउंडेशन चे अध्यक्ष उदय चव्हाण यांनी देखील संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी हा कार्यक्रम यशस्वीपणे राबविला जात असल्याचे सांगताना यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर संजय सोनावणे, जेष्ठ पत्रकार प्रमोद मोहिरे, कुवेसकर यांचे विशेष मोलाचे सहकार्य लाभल्याचे म्हटले.

यावेळी मा. ता. पत्रकार सेवा संघाचे रामभाऊ भोस्तेकर, अनिल मोकाशी, सुनिल राजभर, परेश शिंदे, वैभव सत्वे, पांडुरंग माने, किरण शिंदे व अंकुर फाउंडेशन लोणेरेचे अमित खैरे, प्रविण वारे, चिंतामणी बटवले, मंगेश पेठे, मारुती राऊत, प्रदीप शिंदे हे मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक संतोष खामगावकर केंद्र प्रमुख कुमार खामकर, नुर महमद राऊत, शिक्षक सखी महाडिक(चिनके), प्रतिक्षा ओव्हाळ, मदतनीस जयश्री शिंदे यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यात मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमास येथील ग्रामस्थांची उपस्थिती लक्षणिय होती.

# खांदा वसाहत शहर शाखेच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर

दै.रायगड नगरी । पनवेल

युवासेनेच्या ११व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून युवासेना खांदा वसाहत शहर शाखेच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर व जेष्ठ नागरिकांना मोफत चष्मे वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे उदघाट्न शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील यांच्या हस्ते तालुका संघटक भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, महानगर प्रमुख रामदास शेवाळे , उपमहानगर प्रमुख यतिन देशमुख, शहर प्रमुख सदानंद शिर्के , युवासेना पनवेल विधानसभा अधिकारी पराग मोहिते यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या शिबिरास उपशहर प्रमुख दत्तात्रेय महामुलकर, उपशहर प्रमुख संपत सुवर्णा, शहर संघटक संतोष जाधव, उपशहर संघटक संजीव गमरे, उपशहर संघटक प्रकाश वानखेडे, विभाग प्रमुख सुशांत जाधव, विभाग प्रमुख भोजराज होटकर, उपविभाग प्रमुख जयराम खैरे, युवासेना नवीन पनवेल शहर अधिकारी जितेंदर सिद्धू, पनवेल शहर अधिकारी निखिल भगत, पनवेल उपशहर अधिकारी विराज साळवी, उपकार्यालय प्रमुख नागम सर, तीर्थराज ओनर्स असोसिएशन चे अध्यक्ष केशव ठसाळ,विचुंबे शाखाप्रमुख विशाल भोईर, उप शाखाप्रमुख बाळू भोर, जेष्ठ शिवसैनिक शिवाजी दांगट, तानाजी घारे, सुनिल सावंत साळवी, सुर्वे व सर्व शिवसैनिक युवसैनिक उपस्थित होते. या शिबिरास तीर्थराज ओनर्स असोसिएशन च्या रहिवाशांनी जास्त संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला.



# जिल्ह्यात शेकाप शिवाय कोणताही पक्ष सत्ता काबीज करू शकत नाही : जयंत पाटील




दै.रायगड नगरी । खोपोली

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपंचायत आणि नगरपालिका निवडणुकीत शेकाप कोणाबरोबर आघाडी करणार याचा निर्णय सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन योग्य वेळी घेतला जाईल. मात्र रायगड जिल्ह्यात शेकापच केंद्रस्थानी असून, शेकाप शिवाय कोणताही राजकीय पक्ष सत्ताकाबीज करू शकत नाही असे प्रतिपादन शेकाप सरचिटणीस व आमदार जयंत पाटील यांनी केले. खोपोली- खालापूर शेकाप कार्यकर्त्या मेळाव्यात ते बोलत होते.

रविवारी खोपोलीतील समर्थ मंगल कार्यालयात शेकापचा खालापूर तालुका व खोपोली शहर कार्यकर्ता मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याला सरचिटणीस व विधान परिषद आमदार जयंत पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, जिल्हा चिटणीस आस्वाद पाटील, पनवेल चे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, विलास थोरवे, गुरुनाथ मांजरेकर आदी वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शन माजी आमदार धैर्यशील पाटील व आमदार जयंत पाटील यांनी केले.धैर्यशील पाटील यांनी बोलताना निवडणुकीतील जय पराजय महत्वाचा नसून, शेकाप सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी कायम कटिबद्ध आहे व याही पुढे राहणार आहे हे महत्वाचे असल्याचे सांगितले. विकास होत असताना त्या विकासाच्या पायाखाली येथील गरीब कष्टकरी व शेतकऱ्यांचा जीव जाणार नाही यासाठी शेकाप पक्ष कार्यरत राहील व गरज पडल्यास संघर्ष करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार जयंत पाटील यांनी विस्तृत पणे पक्षाची राजकीय वाटचाल व आगामी रणनीती बाबत माहिती दिली. संपूर्ण रायगड जिल्ह्यात किंवा खोपोली -खालापूर तालुक्यात शेकाप कोणाबरोबर आघाडी करणार या बाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. स्वबळावर शेकाप पूर्ण ताकदीने आगामी निवडणुकीत उतरू शकतो त्यासाठी तयारीला लागण्याचे आवाहन त्यांनी या मेळाव्यात केले. आम्ही कधीही कोणाच्या पाठीत खंजीर खुपसला नाही .लढतो ते समोरासमोर लढतो कारण शेकाप शक्ती ही सामान्य माणूस आहे. दलित वंचीत व शेतकरी- कष्टकरी वर्गाचा आवाज शेकाप असल्याने आपली बांधीलकी त्यांच्याशी असल्याचे पाटील यांनी सांगितले.यावेळी त्यांनी भाजप व भाजप नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर सडकून टीका करून वर्तमान भाजप पक्ष पाट लावून आलेल्या उसन्या नेत्यांचा कोणतेही ध्येय धोरण नसलेला राजकीय पक्ष बनल्याचे सांगितले.

खोपोली चिटणीस अविनाश तावडे, तालुका चिटणीस संदीप पाटील यांच्या जेष्ठ पदाधिकारी संतोष जंगम, खालापूर नगरपंचायतच्या प्रथम नगराध्यक्ष शिवानी जंगम यांच्या नेतृत्वाखाली हा मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली. श्याम कांबळे, भूषण कडव, उत्तम भोईर या पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक जिल्हा सहचिटणीस किशोर पाटील यांनी व सूत्र संचालन तसेच आभार प्रदर्शन गुरुनाथ साठेलकर यांनी केले. खोपोली शहर व तालुक्यातील काही राजकीय कार्यकर्त्यांनी यावेळी शेकापमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.

# नेरुळ-उरण रेल्वे मार्गिका पुढील वर्षी सप्टेंबरपासून सुरू काम अंतिम टप्प्यात

दै.रायगड नगरी । उरण

मध्य रेल्वेवरील नेरुळ ते उरण ही उपनगरीय चौथी संपूर्ण मार्गिका सप्टेंबर २०२२ पासून प्रवाशांच्या सेवेत येणार आहे. यातील खारकोपर ते उरण या दुसर्या टप्प्यातील कामाला गती दिली जात असून ते अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकार्याने दिली.

नेरुळ-बेलापूर-खारकोपर ते उरण उपनगरीय रेल्वे प्रकल्प अनेक वर्षांपासून रखडला आहे. यातील नेरुळ ते बेलापूर, खारकोपर हा पहिला टप्पा नोव्हेंबर २०१८ मध्ये प्रवाशांच्या सेवेत आला आहे; परंतु भूसंपादनासह अनेक अडथळ्यांमुळे नेरुळ ते उरण संपूर्ण प्रकल्प रखडला.

यातील पहिला टप्पा वेळेत पूर्ण झाला. परंतु खारकोपर ते उरण हा दुसरा टप्पा पूर्ण होण्यासाठी बर्याच अडचणींचा सामना करावा लागला. परिणामी प्रकल्पासाठीचा एकूण



५०० कोटींचा खर्च सुमारे १७०० कोटींपर्यंत पोहोचला.

खारकोपरपुढील उरणपर्यंतच्या रेल्वे मार्गासाठी जमीन संपादनाची समस्या कायम होती. यात सिडकोकडून तीन किलोमीटरची जागा रेल्वेला मिळणे बाकी होती. त्याचे भूसंपादन पार पडले आणि ती जागा रेल्वेला मिळाली. त्यामुळे मोठा अडसर दूर झाला असून उर्वरित दुसर्या टप्प्यातील खारकोपर ते उरण मार्गिकाही पूर्ण करून सप्टेंबर २०२२ पासून नेरुळ ते उरण संपूर्ण उपनगरीय मार्गिका प्रवाशांच्या सेवेत येईल, अशी माहिती देण्यात आली.

एकूण २७ किमी लांबीच्या मार्गातील १४.६० किमीचे काम शिल्लक आहे. दुसर्या टप्प्यातील मार्गिके त खारकोपर, गव्हाण, रांजणपाडा, न्हावा शेवा, द्रोणागिरी आणि उरण ही रेल्वे स्थानके आहेत. या प्रकल्पासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात २० कोटी रुपयांचा निधीही दिला आहे. मध्य रेल्वेने टाळेबंदीत हा मार्ग पूर्ण करण्यावर भर दिला असून प्रकल्प पूर्ण झाल्यास नेरुळ व उरणवासीयांबरोबरच अन्य प्रवाशांनाही त्याचा बराच फायदा होईल. यामुळे जेएनपीटी आणि येत्या काळात तयार होणारे नवी मुंबई विमानतळही जोडले जाईल.

# मांडला-काकळघर रस्त्याच्या दुरावस्थेकडे अद्यापही दुर्लक्ष

## रस्त्याचे काम तातडीने न झाल्यास मांडला तीव्र जनआंदोलनाचा इशारा

दै.रायगड नगरी । कोर्लई

गेल्या अनेक वर्षांपासून मुरुड तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागातील दूवा असलेल्या मांडला- काकळघर रस्त्याच्या दुरावस्थेकडे संबंधित बांधकाम खात्याचे अद्यापही दुर्लक्षच असून ग्रामस्थांना होणारा त्रास लक्षात घेऊन या रस्त्याचे काम तातडीने न झाल्यास याविरोधात मांडला ग्रामपंचायतीच्या सरपंच सुचीता सुरेश पालवणकर यांनी तीव्र जनआंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

गेल्या अनेक वर्षापासून मुरुड तालुक्यातील मांडला -काकळघर अंदाजे सात कि.मी. रस्त्याची खाच-खळगे व खड्ड्यांमुळे पार दुरवस्था झालेली आहे. दोन वर्षापूर्वी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून या रस्त्याच्या कोट्यवधी रुपयाच्या कामाला मंजुरी मिळाल्याची चर्चा आहे मात्र कामाचा अद्याप पत्ताच नाही !

मागील वर्षी तीन जुलैच्या निसर्ग चक्रिवादळा नंतर तसेच यंदा झालेल्या ढगफुटी सदृश अतिवृष्टीने साळाव-मुरुड रस्त्यावर मांडला ते काकळघर या अंदाजे सात कि.मी.रस्त्याची जागोजागी खाच-खळगे व खड्ड्यांमुळे पार दुरवस्था झालेली असून दरम्यान यामागील एस.टी.सेवा बंद असल्याने सकाळच्या वेळेत फळ-भाजीपाला व दुध विक्री करणाऱ्या महिलांना तसेच आजुबाजुच्या परिसरातील शेतकरी, शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, महिलांना, विशेष करून गरोदर मातांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

रस्त्याच्या दुरावस्थे बरोबरच येथील दुर्गम ग्रामीण भागातील दहा ते बारा गावांचा दुवा असलेल्या मांडला पुलाची देखील पार दुरवस्था झालेली असून बांधकाम विभागातर्फे पाहाणी करण्यात येऊन काही काळ हा पूल अवजड वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. याठिकाणी नवीन पुलाची मागणी केली जात आहे. सरपंच नात्याने सुचिता पालवणकर ह्या गेल्या तीन वर्षांपासून संबंधित जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे काकळघर रस्ता दुरुस्ती व डांबरीकरणासाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. याबाबतचे वृत्त ही वृत्तपत्रातून देण्यात आले होते. मात्र याकडे अधिकारी वर्गाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष दिसून येते आहे. पुलाच्या दुरावस्थेकडे अजून कानाडोळा केल्यास परिणामी परीसरातील लोकांना याचा त्रास सहन करावा लागणार आहे.याला जबाबदार कोण ? असा सवाल विचारला जात आहे. या रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण तातडीने न झाल्यास वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा निर्धार ग्रामस्थांतून व्यक्त केला जात असून याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी वर्गावर राहिल. असा इशारा मांडला सरपंच सुचिता सुरेश पालवणकर यांनी दिला आहे.